KOLHAPUR CHITRANAGARI
(A Government of Maharashtra Undertaking)

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

KOLHAPUR CHITRANAGARI MAHAMANDAL LTD., KOLHAPUR

(A Government of Maharashtra Undertaking)





वार्षिक अहवाल
२०१६ - १७

ANNUAL REPORT 2016-17





सी. एस. नं. ६४/१, ६५ मुक्काम पोस्ट- मोरेवाडी, तालुका- करवीर,
जिल्हा- कोल्हापूर, पिन- ४१६०१३.

C.S. No. 64/1, 65 a/p. Morewadi, Taluka- Karveer,
Dist- Kolhapur, Pin no. - 416013.

जा. क्र. कोचिन-२०२५/०७
दिनांक: २१-०४-२०२६

संचालक मंडळाच्या सभेची सूचना

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक २१-०४-२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता, ४ था मजला पु. ल. देशपांडे अकादमी प्रभादेवी, दादर मुंबई येथे आयोजित केली आहे. त्यावेळी पुढील कामकाज करण्यात आले.

विषय क्रमांक १:- महामंडळाच्या सन २०१६-१७ या आर्थिक वर्षांचे वार्षिक अहवाल आणि दि. ३१-०३-२०१७ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचे (वित्तीय वर्ष २०१६-१७) महामंडळाचे लेखा विवरण पत्र, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद आणि त्यावरील महालेखाकार, भारत सरकार यांचा अहवाल स्वीकारणे व हे वार्षिक लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यासाठी मान्यता देण्यात आली.

विषय क्रमांक २:-महालेखाकार भारत सरकार यांनी नेमलेले सांविधानिक लेखापाल मे. महेश गुरव आणि कंपनी यांनी परिक्षण केलेले महामंडळाचे सन २०१६-१७ या कालावधीचे वार्षिक लेखे स्वीकृत केले.

आपला विश्वासू,

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
व्यवस्थापकीय संचालक
कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ

प्रति,

मा. ॲड, आशिष मिनल बाबाजी शेलार,

मंत्री, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य,

तथा अध्यक्ष, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

मा. डॉ. किरण सुधा हरी कुलकर्णी, भा.प्र.से. सचिव

सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग

तथा संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर.

श्री. श्रीराम मालती कमलाकरराव पांडे

संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय

तथा संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर

श्री. बाळासाहेब राधाबाई ईश्वर सावंत

व्यवस्थापकीय संचालक

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर

श्री. महेश गुरव, सनदी लेखापाल

पत्ता :- MGC कॅपिटल, ११८५-सी, ३३ अ/२, राजारामपुरी ५ वी लेन,

बँक ऑफ बडोदा जवळ, कोल्हापूर - ४१६००८.

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

दि. ३१ मार्च, २०१७ रोजी
संपलेल्या वर्षासाठी संचालकांचा अहवाल

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित कोल्हापूरच्या वार्षिक अहवाला बरोबर दि. ३१-०३-२०१७ अखेर संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक तसेच ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचा भाग असलेल्या टिपा अहवालासह सादर करण्यास आम्हांस आनंद होत आहे.

१) **कामाचे निष्कर्ष** :- महामंडळाचे सन २०१६-१७ या कालावधीची कामकाज परिणामाची आकडेवारी खाली दर्शविली आहे. जी महामंडळाचे तुलानात्मक परिणाम दर्शविते.

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित
३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद

तपशील	नोंद क्र.	चालू आर्थिक वर्ष 2016-17 च्या शेवटी	मागील नोंदणी कालावधीसाठी आकडेवारी 2015-16
I. समभाग आणि उत्तरदायित्वे :			
(1) समभागधारकांचे निधी			
a. समभाग भांडवल	3	2,43,00,900	2,43,00,900
b. राखीव आणि अतिरिक्त	4	(91,01,946)	(1,43,39,659
c. शेअर वॉरंटद्वारे प्राप्त झाले ली रक्कम	-	-	-
(2) समभाग अर्ज रक्कम प्रलंबित वितरण		14,50,64,000	9,70,64,000
(3) कार्यरत नसलेली उत्तरदायित्वे :			
a. दीर्घकालीन कर्जे	5	33,200	33,200
b. डेफर्ड कर उत्तरदायित्वे (निव्वळ)	-	-	-
c. इतर दीर्घकालीन उत्तरदायित्वे	-	-	-
d. दीर्घकालीन तरतुदी	-	-	-
(4) चालू उत्तरदायित्वे :			
a. लघुकालीन कर्जे	-	-	-
b. देय व्यापार	-	-	-
c. इतर विद्यमान उत्तरदायित्वे	6	75,90,366	30,34,594
d. लघुकालीन तरतुदी	7	40,000	9,090
एकूण		16,79,26,520	11,01,02,125
II. मालमत्ता :			
(1) बिगर चालू मालमत्ता :			
a. स्थिर मालमत्ता :			
i स्थावर मालमत्ता	8	18,76,457	20,89,586
ii जंगम मालमत्ता	-	-	-
iii भांडवली काम सुरू	-	10,72,61,057	4,88,08,167
b. बिगर चालू गुंतवणूक	-	-	-
c. डेफर्ड कर- मालमत्ता (निव्वळ)	-	-	-
d. दीर्घकालीन कर्ज आणि आगाऊ रकमा	-	-	-
e. इतर बिगर चालू मालमत्ता	-	-	-
(2) चालू मालमत्ता :			
i चालू गुंतवणुका	9	23,13,092	4,71,58,170
ii इन्वेंटरीज	10	4,16,955	4,16,955
iii व्यापारातून प्राप्त होणाऱ्या रकमा	11	4,87,272	4,87,272
iv रोख आणि रोख समकक्ष	12	5,26,45,409	83,15,017
v लघुकालीन कर्जे आणि आगाऊ रकमा	13	-	-
vi इतर चालू मालमत्ता	14	29,26,278	28,26,958
एकूण		16,79,26,520	11,01,02,125
आर्थिक विवरणपत्राचा भाग असलेल्या सोबत जोडलेल्या नोंदी पाहा	1,2 & 20		

२) **कार्य** :- कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ हे पूर्णतः बंद पडले होते. तथापि सन २०१२ पासून या चित्रनगरीच्या पुर्नउभारणीचे काम सुरु असून, पुर्नउभारणी प्रकल्पांतर्गत टप्पा क्र. १, टप्पा क्र. २

व टप्पा क्र. ३ मध्ये शासनाने मंजूर केलेल्या अनुदान/निधीनुसार कामे पूर्ण होण्याच्या अंतिम टप्प्यात आहेत.

३) योजनांची परिपूर्तता : १) कोल्हापूर चित्रनगरीमध्ये पाटील वाडा, स्टुडिओ नं १,२,
२) कोल्हापूर चित्रनगरीमध्ये नवीन स्टुडिओ नं. ३ ग्रीन रुमसह बांधणे, कलाकार व तंत्रज्ञमंडळीसाठी वसतिगृह बांधणे, डब्लू बी. एम. पध्दतीचा वाहनतळ उभारणे.

४) भांडवल व वित्तीय व्यवस्था : कोल्हापूर चित्रनगरी उभारणीकरिता महाराष्ट्र शासनाकडून प्रतिवर्षी कामांच्या आराखड्यानुसार भागभांडवल अनुदान मंजूर करण्यात येते.

५) वित्तीय वर्ष समाप्त होताना संचालकांचा अहवाल व सामग्रीमधील महत्वाच्या बदलाबाबत :- वित्तीय वर्षाच्या शेवटी संचालकाचा अहवाल व सामग्रीमध्ये महत्वाचे असे बदल करण्यात आलेले नाहीत अथवा असे कुठेही आश्वासित केलेले नाही. त्यामुळे महामंडळाच्या वित्तीय स्थितीवर तसेच वित्तीय निष्कर्षावर कोणत्याही प्रकारचे परिणाम होणार नाहीत.

६) लेखांकन धोरणे आणि सामग्रीबाबतचे आदेश पारित करणे किंवा न्यायालयीन प्राधिकरणाचे आदेशामुळे महामंडळाच्या चालु असलेल्या भविष्यातील कार्यभारावर कोणत्याही प्रकारच्या परिणामाबाबतः- या वर्षाच्या कालावधीमध्ये लेखांकन धोरणे आणि सामग्रीबाबतचे आदेश पारित करणे किंवा न्यायालयीन प्राधिकरणाचे आदेशामुळे महामंडळाच्या चालु असलेल्या भविष्यातील कार्यभारावर कोणत्याही प्रकारचे परिणाम होणार नाहीत. याबाबतची दक्षता बाळगण्यात आलेली आहे.

ठेवी :- या वर्षाच्या कालावधीत ३१-०३-२०१७ पर्यंत महामंडळाने सामान्य जनतेकडून कोणत्याही प्रकारच्या ठेवी स्वीकारलेल्या नाहीत किंवा त्यांचे नुतनीकरण केलेले नाही. दिनांक ३१-०३-२०१७ रोजी दावे केलेल्या कोणत्याही प्रकारच्या बेवारशी ठेवी नाहीत.

७) व्यवसायाच्या स्वरुपातील बदल:- व्यवसायाच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही.

८) संचालक :- अहवाल वर्षात महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालीलप्रमाणे होती.

अ.क्र	नाव	पद	कालावधी
१.	मा. ॲड, आशिष मिनल बाबाजी शेलार, मंत्री, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, तथा अध्यक्ष, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.	अध्यक्ष	२०२५

१. कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार महामंडळाच्या मालमतेचे संरक्षण करण्यासाठी तसेच फसवणूक आणि इतर अनियमितता शोधून काढण्यासाठी व ते रोखण्यासाठी आवश्यक आणि पुरेसे लेखे दप्तर ठेवण्याची काळजी महामंडळाने घेतली आहे.

२. महामंडळाचे लेखे तयार करताना चालू असलेल्या संबंधित बाबींची पूर्तता केलेली आहे.

३. लेखा परीक्षक : महेश एम. गुरव (सनदी लेखापाल) रजिस्ट्रेशन नं. १०१५५१ डब्ल्यू यांना महामंडळाचे वैधानिक लेखा परिक्षक म्हणून महामंडळाची २०१३-१४ या वार्षिक सर्वसाधारण सभा समाप्त होईपर्यंत नियुक्त करण्यात आलेली आहे.

४. ऊर्जा स्त्रोत, तांत्रिक, विदेशी चलनाद्वारे उत्पन्न आणि खर्चाबाबत ऊर्जा व तंत्रज्ञान संदर्भातील आवश्यक माहिती सादर करणे बंधनकारक नसल्यामुळे येथे घेतले नाही. विदेशी चलनाद्वारे होणारे महामंडळाचे व्यवहार उत्पन्न व खर्चात नाहीत.

५. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (पोश) कंपनी पोशाच्या तरतुदींचे पालन करते. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तरतुदी (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा, २०१३ च्या अनुषंगाने पुनरावलोकन वर्षात लैंगिक छळाच्या कोणत्याही घटना नोंदवल्या गेल्या नाहीत.

६. कलम १८६ नुसार कर्जाचा तपशील, हमी शुल्क किंवा गुंतवणूक या वर्षामधील घेतलेल्या आढाव्यानुसार महामंडळाने कोणत्याही प्रकारचे अग्रीम, कर्ज याबाबत जामीन दिलेला नसून गुंतवणूक केलेली नाही.

७. ऋणनिर्देश : महामंडळ विशेषतः सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, आमचे बैंकर्स, सहकारी आणि विविध संस्था जे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या महामंडळाच्या काराभारात सहभागी होते व ज्यांनी अमूल्य सहकार्य व सेवा दिल्या त्यांची नोंद घेत आहे. महामंडळामध्ये ज्या विविध संस्थांनी निधी गुंतविले आहेत, त्यांचेही महामंडळ आभारी आहे. महामंडळातील कर्मचा-यांच्या प्रामाणिक प्रयत्नाबद्दलही महामंडळाला त्यांचा अभिमान आहे.

स्थळ :- मुंबई
दिनांक :-

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
व्यवस्थापकीय संचालक
कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्या.

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या सन २०१६-१७ चे लेखे विधान मंडळाच्या सदनात पटलावर ठेवण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे खालीलप्रमाणे:-

प्रस्तावना:-

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाची कंपनी कायदा, १९५६ अन्वये दिनांक १४.०३.१९८५ रोजी राज्य शासनाकडून स्थापना करण्यात आली. मात्र हे महामंडळ सतत तोट्यात चालत असल्यामुळे कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ बंद करण्याची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक उपक्रम पुर्नरचना मंडळाने केली होती.

शासनाने दि.०९.११.२००५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळासह काही महामंडळे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

तदनंतर महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुर्नरचना मंडळाने केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर, यांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्ती योजना शासन निर्णय दि. २४ सप्टेंबर,२००७ अन्वये लागू करण्यात आली. कोल्हापूर चित्रनगरी बंद करण्यास मराठी चित्रपट सृष्टीचा व स्थानिक जनतेचा विरोध लक्षात घेऊन शासन निर्णय दि. १० मार्च, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये हे महामंडळ बंद न करता त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेतला.

विलंबाची कारणे :-

१) सन, १९९९ पासून महामंडळ दुरावस्थेत असल्यामुळे आणि नियमित अधिकारी कर्मचारी वर्ग कार्यरत नसल्यामुळे महामंडळाची अवस्था अत्यंत बिकट झाली.

२) कार्यालयाची इमारत (पाटीलवाडा), स्टुडिओची इमारत येथे खूप प्रमाणात वाळवी लागून महामंडळाचा बहुतांशी अभिलेख खराब झालेला होता.

३) त्यामुळे लेखा परिक्षणाकरीता लेखाविषयक अभिलेख उपलब्ध नसल्याने बँक विवरणपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु बँकेकडून इतका जूना अभिलेख उपलब्ध करुन देण्यास असमर्थता दाखविण्यात आली.

४) तत्कालिन स्थितीत महामंडळाकडे लेखापरीक्षणाकरीता आवश्यक असलेले अभिलेख उदा. रोख नोंदवही, खर्चाची प्रमाणके, देयके इत्यादी उपलब्ध नव्हती ही वस्तुस्थिती आहे. याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र महालेखाकार कार्यालयास सादर करण्यात आले आहे.

५) शासन निर्णय दि. १० मार्च, २००८ अन्वये महामंडळ पुनर्जिवित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कोल्हापूर चित्रनगरी पुनर्जिवित्त झाल्यानंतर त्यांचे सर्व व्यवहार गोरेगाव चित्रनगरी येथून करण्याचे आदेश देण्यात आले. कोल्हापूर चित्रनगरीचे सर्व दप्तर गोरेगाव येथे होते. तथापि, गोरेगाव चित्रनगरी कार्यालयास आग लागल्यामुळे अभिलेखे नष्ट झाले. ही बाब महालेखाकार कार्यालयास कळविण्यात आली होती. या अनुषंगाने सन २००४-०५ ते २००८-०९ चे दप्तर उपलब्ध

न झाल्यामुळे लेखे पूर्ण करता आले नाहीत. याबाबत महालेखाकार कार्यालय, सनदी लेखापाल व व्यवस्थापकीय संचालक यांच्या चर्चेअंती सदरचे लेखे दप्तर उपलब्ध झाल्यानंतर तयार करावे असे ठरले.

६) शासन निर्णय दि. २४ सप्टेंबर, २००७ अन्वये सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीत महामंडळातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा स्वेच्छानिवृत्तीने समाप्त करण्यात आल्या. त्यामुळे महामंडळाचे आर्थिक व्यवहार बंद झाले. महामंडळ कार्यरत नसल्यामुळे सदर कालावधीतील दप्तर वाळवीमुळे खराब झाले. सदर बाब महालेखाकार कार्यालयास दि.२६-०९-२०१९ व दि.०४-०१-२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली होती.

७) सन २००४-०५ ते २०११-१२ चे लेखे तयार करण्यासाठी अंतर्गत हिशेब तपासणीस श्री. प्रदीप दोषी यांची दि.०७-०७-२०१२ पत्रान्वये नियुक्ती करण्यात आली. श्री. दोषी यांनी सन २००९-१० ते २०११-१२ चे लेखे तयार करुन जानेवारी, २०१५ मध्ये महामंडळास उपलब्ध करुन दिले व सदरचे लेखे दि.०५ जानेवारी, २०१५ रोजी संचालक मंडळाने मान्यता दिल्यानुसार (संचालक मंडळाचा ठराव क्र. ३बी, ३सी, व ३डी) महालेखाकार कार्यालयाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल श्री. प्रदिप वडेर यांना पुढील लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात आले.

८) सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीच्या लेख्यांना तत्कालिन सांस्कृतिक कार्यमंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष मा. श्री. विनोदजी तावडे साहेब यांची माहे दि.१३-०२-२०१९ रोजी मान्यता मिळूनही पुनःश्च परिक्षणामुळे ही सर्व प्रक्रिया नव्याने पार पाडावी लागली आहे. ही बाब ध्यानात घेणे आवश्यक आहे.

९) सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीचे लेखे महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात आले होते. सदर लेख्यांवर महालेखाकार कार्यालयाने पत्र क्र.LAP-TNC/AMG - IV/36 दि.२७-११-२०२० च्या पत्रान्वये आर्थिक वर्ष सन २००४-०५ ते २००८-०९ या लेख्यांवर आक्षेप नोंदवले. परंतु कोविड १९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादूर्भावामुळे सर्व यंत्रणा ठप्प झाली. त्यामुळे लावण्यात आलेल्या निर्बंधामुळे कामकाजावर परीणाम झाला. परीणामी त्या आक्षेपांचे स्पष्टीकरण महालेखाकार कार्यालयास दि. ०९-०६-२०२२, दि.११-०८-२०२२, व दि.२१-०८-२०२३ रोजी कळविण्यात आले.

१०) सादर केलेल्या स्पष्टीकरणासंदर्भात महालेखाकार कार्यालयाने चर्चेअंती सन २०१०-११ ते २०११-१२ या आर्थिक वर्षात लेख्यांची दुरुस्ती करुन फेर सादर करण्यास सांगितले.

११) सदर बदलण्यात आलेले लेखे पुन्हा नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत नेमण्यात आलेले श्री. प्रदिप वडेर यांना कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर या कार्यालयाचे पत्र क्रमांक कोचिन/३९९/२०२२ दि.१६-०९-२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्यानुसार श्री. प्रदिप वडेर यांनी या लेख्यांमध्ये दुरुस्ती करुन कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाच्या कार्यालयामध्ये सादर केले.

१२) महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्या दि.०८-०५-२०२३ च्या पत्राच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर या कार्यालयाच्या दि.०७-११-२०२३ च्या पत्रान्वये सादर करण्यात आली.

१३) महालेखाकार कार्यालय, प्रतिष्ठा भवन, मुंबई यांचे दि.१५-१२-२०२३ रोजीच्या पत्रान्वये कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीचे लेखा परीक्षणाकरिता वरिष्ठ लेखापरिक्षक व त्यांचे सहा अधिकाऱ्यांचे पथक गोरेगाव चित्रनगरी येथील कार्यालयात परीक्षणासाठी आले होते. दि.१८-१२-२०२३ ते दि.०५-०१-२०२४ या कालावधीत कोल्हापूर चित्रनगरीचे सन २००४-०५ ते २०११-१२ या कालावधीचे लेखापरीक्षण करण्यात आले असून, सदर लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने त्यांनी त्यांचे पत्र क्र. प्रमले/लेप-/ पीएसयु/केसीएमएल/२००४-०५ से २०११-१२/१०२ दि. २६-४-२०२४ च्या पत्रान्वये सुचविण्यात आलेल्या त्रुटीची सुधारणा पुढील वर्षांच्या लेख्यांमध्ये करण्याबाबत सुचविले. सदर लेखा परिक्षणा दरम्यान महालेखाकार कार्यालयाच्या उप महालेखापरीक्षक यांनी दि.२८-१२-२०२३ रोजी प्रत्यक्ष भेट देवून कोल्हापूर चित्रनगरीच्या सुरु असलेल्या लेखापरीक्षणाचा आढावा घेतला होता, ही विशेषत्वाने नमूद करण्याची बाब आहे.

१४) सन २०१२-१३ ते २०१५-१६ या लेख्यांच्या संदर्भात काढलेल्या आक्षेपांची पूर्तता कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर या कार्यालयांचे पत्र क्र. कोचिन-२०२४/२७५ दि. १५-०२-२०२४ च्या पत्रानव्ये करण्यात आली. या सादर करण्यात आलेल्या आक्षेपांच्या पूर्ततेच्या अनुषंगाने सदर लेखे ३ प्रतीत संचालक मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मांडून त्याची मान्यता झाल्यानंतर महालेखाकार कार्यालयास अहवाल सादर करावे असे महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्र. प्रमले/लेप-१/पीएसयु/केसीएमएल/२०१२-१३ से २०१५-१६/९९, दि.२५-०४-२०२४ तसेच पत्र क्र. प्रमले/लेप-१/पीएसयु/केसीएमएल/२०१२-१३ से २०१५-१६/१०२ दिनांक २६-०४-२०२४ च्या पत्राद्वारे सूचित करण्यात आले आहे.

१५) वरील सर्व मुद्देनिहाय परीस्थिती पाहता कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाचे वार्षिक लेखे विधान मंडळाच्या सदनात पटलावर ठेवण्यास विलंब झाल्याचे दिसून येते.

१६) मात्र कागदपत्रांची अनुपलब्धता, जागेची कमतरता, कुशल मनुष्यबळाची उणिव तसेच महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्याकडून वारंवार उपस्थित केलेले मुद्दे यामुळे या प्रक्रियेस विलंब झालेला दिसून येतो. मात्र हा विलंब हेतूपुरस्सर अथवा पूर्वनियोजित नसून तो कालौघात घडला असल्याचे वरील सर्व मुद्द्यांचे अवलोकन करता दिसून येते.

१७) सन २०१२-१३ से २०१५-१६ या कालावधीतील लेखे सन जुलै, २०२४ मध्ये विधानमंडळ व विधानपरीषद पटलावर ठेवण्यात आले असून त्यास मान्यता मिळालेली आहे.

१८) २०२४-२५ या वर्षात विधान सभेची निवडणूक जाहीर झाल्याने व माहे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत आचार संहिता लागू असल्याने संचालक मंडळाची बैठक आयोजित होऊ

शकली नाही. या कारणास्तव सन २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीचे लेखे विधानमंडळाच्या पटलावर ठेवता आले नाही.

१९) महालेखाकार, मुंबई यांनी सन २०१६-१७ या वर्षाच्या लेख्यांना समीक्षा प्रमाणपत्र दिलेले व त्या संचालक मंडळाने स्विकृत केलेले लेखे आता सभागृहासमोर सादर करण्यात येत आहेत.

.....

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

वार्षिक विवरण उतारा फार्म नंबर एमजीटी-९

१. कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ९२ (३) अन्वये आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ मधील नियम १२ (१) अन्वये

१	कंपनीचा ओळख क्रमांक	३५६१२
२	नोंदणीचा दिनांक	१४-०३-१९८५
३	कंपनीचे नाव	कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, मर्यादित, कोल्हापूर
४	कंपनीचा वर्ग उपवर्ग	राज्य शासनाची समभागाद्वारे मर्यादित कंपनी.
५	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता आणि संपर्काचा तपशील	मु. पो. मोरेवाडी, तालुका करवीर, जिल्हा कोल्हापूर- ४१६०१३.
६	कंपनीचा स्टॉक एक्सचेंजच्या यादीत समावेश आहे का	असूचीबध्द.
७	निबंधक आणि हस्तांतरण दलाल असल्यास त्यांचे नाव, पत्ता आणि संपर्काचा तपशील	लागू नाही.

२. सूत्रधारी, उपकंपनी आणि सहयोगी कंपनीचा तपशील

अ.क्र.	कंपनीचे नाव आणि पत्ता	सीआयएन /जीएलएन	सूत्रधारी / उपकंपनी /सहयोगी	धारण केलेले समभाग	लागू असलेले कलम
लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही	लागू नाही

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल

प्रति,

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादितचे सदस्य

एकल आर्थिक ताळेबंदाच्या लेखापरीक्षणाचा अहवाल

मत

आम्ही कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित ("कंपनी") च्या सोबत जोडलेल्या आर्थिक विवरणपत्रांचे लेखापरीक्षण केले आहे. त्यात दि. ३१ मार्च, २०१७ रोजीनुसार ताळेबंद, संपलेल्या वर्षासाठी नफा आणि तोट्याचे पत्रक तसेच रोख प्रवाह विवरणपत्र आणि महत्त्वाच्या लेखापरीक्षण धोरणांचा सारांश तसेच इतर आवश्यक त्या स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

आर्थिक ताळेबंदासंबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी

कंपनी कायदा २०१३ ("कायदा") च्या कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या प्रकरणांसाठी भारतात सामान्यतः स्वीकारल्या जाणाऱ्या लेखापरीक्षण तत्वांनुसार तसेच कायद्याच्या कलम १३३ मध्ये नमूद केलेल्या लेखापरीक्षण तत्वांनुसार, सोबत वाचा कंपनी (लेखापरीक्षण) नियम २०१४ नुसार कंपनीची आर्थिक स्थिती, आर्थिक कामगिरी आणि रोख प्रवाह यांच्याबाबत सत्य आणि न्याय्य दृष्टीकोन देणारे आर्थिक ताळेबंद तयार करणे आणि सादर करणे यासाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार आहे. या जबाबदारीत कंपनीच्या मालमत्तांच्या सुरक्षेसाठी आणि घोटाळे तसेच इतर अनियमितता शोधून त्या टाळण्यासाठी कायद्याच्या तरतुदींनुसार पुरेशा लेखा नोंदी राखण्याची जबाबदारीही समाविष्ट आहे. तसेच सुयोग्य लेखापरीक्षण धोरणांची निवड आणि लागू करणे, वाजवी आणि सुयोग्य असलेले अंदाज वर्तवून निर्णय घेणे, पुरेशा अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची अंमलबजावणी आणि देखभाल जी लेखा नोंदींच्या अचूकता आणि पूर्णत्व दर्शवण्यासाठी योग्य पद्धतीने कार्यरत आहे. तसेच लेखापरीक्षणांच्या नोंदींचे पूर्णत्व जे सत्य आणि न्याय्य दृष्टीकोन देणारे आणि घोटाळ्याने किंवा चुकीने प्रत्यक्ष तफावतींपासून मुक्त आर्थिक ताळेबंद तयार करणे आणि सादर करण्याशी सुसंगत असतील.

लेखापरीक्षकांची जबाबदारी

आमची जबाबदारी आमच्या लेखापरीक्षणानुसार या आर्थिक ताळेबंदांबद्दल मत व्यक्त करण्याची आहे. आम्ही कायद्याच्या तरतुदी, कायद्यांच्या तरतुदी व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियमांतर्गत समाविष्ट करणे आवश्यक असलेले लेखा आणि लेखापरीक्षण मानके तसेच प्रकरणे विचारात घेतली आहेत.

आम्ही कायद्याच्या कलम १४३(१०) अंतर्गत नमूद करण्यात आलेल्या लेखापरीक्षणाच्या मानकांनुसार लेखापरीक्षण पार पाडले आहे. या मानकांनुसार आम्ही नैतिक आवश्यकतांची पूर्तता करून अशा रितीने लेखापरीक्षण नियोजित करून पार पाडणे अपेक्षित आहे जेणेकरून आर्थिक विवरणपत्रे ही प्रत्यक्षातील चुकीच्या नोंदींपासून मुक्त असतील.

लेखापरीक्षणात आर्थिक विवरणपत्रातील रकमा आणि अस्वीकरणांबाबत लेखा पुरावे गोळा करण्याच्या प्रक्रियांचा समावेश आहे. यात निवडण्यात आलेल्या प्रक्रिया लेखापरीक्षकाच्या

अंदाजांवर आधारित असतात, ज्यात आर्थिक विवरणपत्रांच्या घोटाळ्याने किंवा चुकीने झालेल्या प्रत्यक्ष त्रुटींच्या धोक्याचे मूल्यमापन समाविष्ट असते. या धोक्यांचे मूल्यमापन करत असताना लेखापरीक्षक कंपनीची आर्थिक विवरणपत्रे तयार करणे आणि न्याय्य सादरीकरणाशी संबंधित अंतर्गत नियंत्रणांचा विचार करतात जेणेकरून परिस्थितीत सुयोग्य असलेल्या लेखा प्रक्रियांची रचना करता येईल. परंतु कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणाच्या प्रभावीपणाबाबत आमचे मत व्यक्त करण्याच्या हेतूने नाही. लेखापरीक्षणात व्यवस्थापनाने वापरलेल्या लेखापरीक्षण धोरणांची सुयोग्यता आणि लेखा अंदाजांचा वाजवीपणा तपासण्याचाही समावेश असतो. त्याचबरोबर आर्थिक ताळेबंदांच्या एकूण सादरीकरणाचे मूल्यमापनही समाविष्ट असते. आमच्या मते आम्ही प्राप्त केलेला लेखा पुरावा आमच्या लेखा परीक्षण मतांसाठी एक पाया देण्यासाठी पुरेसा आणि सुयोग्य आहे.

मतांचा पाया

आम्ही आमचे लेखापरीक्षण कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या लेखापरीक्षण (Sas) च्या मानकांनुसार केले. त्या मानकांखालील आमच्या जबाबदाऱ्या आमच्या अहवालाच्या आर्थिक विवरणांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाच्या जबाबदाऱ्यांमध्ये वर्णन केल्या आहेत. कंपनी कायदा, २०१३ आणि तेथील नियमांच्या तरतुदींखालील आर्थिक विवरणांच्या आमच्या लेखापरीक्षणाशी संबंधित असलेल्या नैतिक आवश्यकतांसह भारताच्या चार्टर्ड अकाउंटंट्स संस्थेने जारी केलेल्या आचारसंहितेनुसार आम्ही कंपनीपासून स्वतंत्र आहोत आणि आम्ही आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या आणि या नियमांनुसार आमच्या इतर नैतिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. आम्हाला विश्वास आहे की आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आमच्या मताला आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत.

लेखापरीक्षणाचे प्रमुख घटक

मुख्य लेखापरीक्षण बाबी म्हणजे सध्याच्या कालावधीच्या आर्थिक विवरणांच्या आमच्या लेखापरीक्षणात सर्वात जास्त महत्त्वाच्या असलेल्या बाबी होत. या बाबी आमच्या संपूर्ण आर्थिक ताळेबंदाच्या लेखापरीक्षणासंदर्भात आणि त्यावर आमचे मत तयार करताना संबोधित करण्यात आल्या होत्या आणि आम्ही या प्रकरणांवर वेगळे मत देत नाही.

इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांबाबत अहवालः

१. भारत सरकारने कायद्याच्या कलम १४३ मधील पोटकलम (११) च्या अनुषंगाने जारी आणि सुधारित केलेले कंपनी (लेखापरीक्षकांचा अहवाल) आदेश २०१६ ("आदेश") नुसार आवश्यक असल्याप्रमाणे आम्ही आदेशाच्या परिच्छेद ३ आणि ४ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रकरणी माहिती "जोडपत्र अ" मध्ये देत आहोत.

2. कायद्याच्या कलम १४३ मध्ये आवश्यक असल्याप्रमाणे आम्ही नमूद करतो कीः

a) आम्ही आमच्या लेखापरीक्षणासाठी आमचे ज्ञान व माहितीनुसार आवश्यक असलेली सर्व माहिती आणि स्पष्टीकरणे प्राप्त केली आहेत.

b) आमच्या मते कायद्यानुसार आवश्यक असल्याप्रमाणे योग्य ती लेखापुस्तके कंपनीकडून राखण्यात आली आहेत जे आमच्या या पुस्तकांच्या परीक्षणातून दिसून येते.

c) या अहवालातून तपासण्यात आलेला ताळेबंद, नफा आणि तोटा पत्रक लेखापुस्तकानुसार सुयोग्य आहेत.

d) आमच्या मते उक्तनिर्देशित एकल आर्थिक ताळेबंद कायद्याच्या कलम १३३ सोबत वाचा कंपनी (लेखापरीक्षण) नियम २०१४ चा नियम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार सुसंगत आहेत;

e) संचालकांकडून ३१ मार्च २०१६ रोजी प्राप्त झालेल्या आणि संचालक मंडळाने नोंदींवर घेतलेल्या लेखी सादरीकरणाच्या आधारे कायद्याच्या कलम १६४ (२) च्या अनुषंगाने कोणताही संचालक ३१ मार्च २०१६ रोजी संचालकपदावर नेमण्यापासून अपात्र ठरवण्यात आलेला नाही;आणि

f) कंपनीच्या आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची सुयोग्यता आणि कार्यक्षमतेच्या संदर्भात **"परिशिष्ट B"** मधील आमच्या स्वतंत्र अहवालाचा संदर्भ घ्यावा.

g) कंपनी (लेखा आणि लेखापरीक्षण) नियम २०१४ च्या नियम ११ नुसार लेखापरीक्षकांच्या अहवालात नमूद करण्याच्या इतर बाबींसंबंधी आमच्या मते आणि आमच्या माहितीनुसार तसेच आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणांनुसार:

i. कंपनीच्या आर्थिक स्थितीवर प्रभाव टाकणारे कोणतेही प्रलंबित खटले नाहीत.

ii. कंपनीने डेरिव्हेटिव्ह कंत्राटांसह कोणतेही दीर्घकालीन कंत्राट केलेले नाही ज्यामुळे संभाव्य प्रत्यक्ष नुकसान होईल.

iii. कंपनीकडून इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंडमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही रकमा नव्हत्या.

स्वतंत्र लेखापरीक्षक अहवाल "जोडपत्र अ"

दि ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीच्या आर्थिक स्टेटमेन्टच्या सम तारखेच्या आमच्या अहवालाच्या -इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवरील अहवाल॰ या शीर्षकाखाली परिच्छेद

१ मध्ये संदर्भित:

i. (a) कंपनी संख्यात्मक तपशील, स्थान, मालमत्ता वर्गीकरण, ओळख क्रमांक, एकत्रित घसारा दर्शवणाऱ्या संख्यात्मक नोंदी राखत नाही. स्थिर मालमत्तांच्या पडताळणीसंबंधी नोंदी रेकॉर्डवर नाहीत.

(b) स्थावर मालमत्तांचे मालकीहक्क कंपनीच्या नावे आहेत.

ii. (a) इन्व्हेंटरीच्या पडताळणीशी संबंधित नोंदी रेकॉर्डवर नाहीत.

(b) हिशोबपुस्तकांमध्ये योग्य रीतीने व्यवहार केलेल्या पुस्तकांच्या नोंदींच्या तुलनेत यादीच्या प्रत्यक्ष पडताळणीत आढळलेल्या विसंगती रेकॉर्डवर नव्हत्या.

iii. कंपनी कायदा २०१३ (कायदा) च्या कलम १८९ अंतर्गत राखण्यात आलेल्या नोंदणीपुस्तकात व्याप्त केलेल्या कंपन्या, संस्था किंवा इतर पक्षकारांकडून कोणतीही सुरक्षित किंवा असुरक्षित कर्जे घेतलेली नाहीत किंवा दिलेली नाहीत. त्यानुसार, आदेशातील परिच्छेद ३ (iii)(अ) ते (क) कंपनीला लागू नाही आणि त्यामुळे मत व्यक्त करण्यात आलेले नाही.

iv. आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांनुसार कंपनीने कर्ज, गुंतवणूक, हमी आणि सुरक्षितता यांच्या संदर्भात कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८५ आणि १८६ मधील तरतुदींचे पालन केले आहे.

v. कंपनीने लोकांकडून कोणत्याही ठेवी स्वीकारल्या नाहीत आणि म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेले निर्देश आणि कलम ७३ ते ७६ मधील तरतुदी किंवा कायदा आणि कंपन्या (ठेव स्वीकारणे) नियम २०१५ मधील इतर कोणत्याही संबंधित तरतुदी लोकांकडून स्वीकारल्या जाणाऱ्या ठेवींच्या संदर्भात लागू नाहीत.

vi. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार केंद्र सरकारने कायद्याच्या कलम १४८ (१) अंतर्गत कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या सेवांबाबत खर्च नोंदी राखण्याबाबत विनिर्दिष्ट केलेले नाही.

i. (a) आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही तपासलेल्या कंपनीच्या नोंदींनुसार आमच्या मते कंपनीने भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी, कर्मचारी राज्य विमा, प्राप्तीकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमाशुल्क, अबकारी शुल्क, उपकर आणि इतर लागू असलेल्या प्रत्यक्ष वैधानिक देय रकमा अशा लेखापुस्तकातील वजा केलेल्या/ लागू केलेल्या निर्विवाद वैधानिक देय रकमा सुयोग्य

प्राधिकाऱ्यांकडे वर्षभराच्या कालावधीत नियमितपणे जमा केल्या नाहीत. आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आणि आम्ही तपासलेल्या कंपनीच्या नोंदींनुसार कंपनीकडून ३१ मार्च २०१७ रोजी भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी, कर्मचारी राज्य विमा, प्राप्तीकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमाशुल्क, अबकारी शुल्क, उपकर यांची देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीपेक्षा जास्त काळ थकबाकी नव्हती. (लेखापरीक्षणाला असलेल्या जोडपत्रातील शेऱ्यांच्या सापेक्ष.)

(b) आम्हाला देण्यात आलेली माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कोणत्याही विवादामुळे विक्रीकर, प्राप्तीकर, संपदा कर, सेवा कर, अबकारी कर आणि उपकर यांच्या थकबाकी राहिलेल्या कोणत्याही देय रकमा नाहीत. (लेखा अहवालातील जोडपत्रात असलेल्या शेऱ्याच्या सापेक्ष)

vii. कंपनीने वर्षभरात बँकांच्या थकबाकीच्या देय रकमांमध्ये कसूर केलेली नाही आणि वर्षभरात कर्जरोखेही दिलेले नाहीत. कंपनीने वित्तीय संस्था किंवा सरकारकडून कर्ज घेतलेले नाही आणि रोखेही जारी केलेले नाहीत.

viii. लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक ऑफर किंवा कर्ज साधने आणि मुदत कर्जासह पुढील सार्वजनिक ऑफरद्वारे पैसे उभे केलेले नाहीत. त्यामुळे ऑर्डरच्या खंड ३ (ix) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत, म्हणून त्यावर टिप्पणी केली जात नाही.

ix. आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार कंपनीबाबत किंवा कंपनीकडून कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष घोटाळा झाल्याची घटना दिसून किंवा नोंदवण्यात आलेली नाही आणि व्यवस्थापनाकडून आम्हाला अशा कोणत्याही घटनेची माहिती दिली गेलेली नाही.

x. लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणांवर आधारित, व्यवस्थापकीय मोबदला कंपनी कायद्याच्या अनुसूची V सह वाचलेल्या कलम १९७ च्या तरतुदींद्वारे अनिवार्य केलेल्या आवश्यक मंजुरीनुसार अदा करण्यात आला आहे किंवा प्रदान करण्यात आला आहे.;

xi. आमच्या मते, कंपनी ही निधी कंपनी नाही. त्यामुळे, आदेशाच्या खंड ४ (xii) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत.

xii. आमच्या मते, संबंधित पक्षांसोबतचे सर्व व्यवहार कंपनी कायदा २०१३ च्या कलम १७७ आणि १८८ चे पालन करतात आणि लागू लेखा मानकांनुसार आवश्यक तपशील वित्तीय विवरणांमध्ये उघड केले गेले आहेत.

xiii. लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणाच्या आधारावर, कंपनीने समीक्षणाधीन वर्षात कोणतेही प्राधान्य वाटप किंवा समभागांचे खाजगी प्लेसमेंट किंवा पूर्ण किंवा अंशतः परिवर्तनीय डिबेंचर केलेले नाहीत. त्यानुसार, ऑर्डरच्या खंड ३ (xiv) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत आणि त्यामुळे त्यावर टिप्पणी केली जात नाही.

xiv. लेखापरीक्षण प्रक्रियेच्या आणि व्यवस्थापनाने दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणांच्या आधारे, कंपनीने संचालक किंवा त्याच्याशी संबंधित व्यक्तींसोबत कोणतेही बिगर रोख व्यवहार केलेले नाहीत. त्यानुसार, ऑर्डरच्या खंड ३ (xv) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत आणि त्यामुळे त्यावर टिप्पणी केली जात नाही.

xv. आमच्या मते, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा १९३४ च्या कलम ४५ IA अंतर्गत कंपनीची नोंदणी करणे आवश्यक नाही आणि त्यानुसार, ऑर्डरच्या खंड ३ (xvi) च्या तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत आणि त्यामुळे त्यावर टिप्पणी केली जात नाही.

महेश गुरव अँड कंपनीसाठी
चार्टर्ड अकाऊंटंट्स
एफ आर एन : ११६५९८ डब्ल्यू

सीए महेश एम. गुरव
भागीदार
एम. क्र. १०५५१
यूडीआयएन: **२४१०१५५ बीकेसीपीएलक्यू ८६८३**

दिनांक : २०/०७/२४
स्थान : कोल्हापूर

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादितच्या एकल आर्थिक ताळेबंदाच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या समतारखेच्या अहवालाचे "जोडपत्र ब"

कंपनी कायदा २०१३ ("कायदा") च्या कलम १४३ च्या पोटकलम ३ च्या कलम (i)अंतर्गत आर्थिक नियंत्रणांबाबत अहवाल

आम्ही ३१ मार्च २०१७ पर्यंत कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लिमिटेड ("कंपनी") च्या त्या तारखेला संपलेल्या वर्षासाठी कंपनीच्या स्वतंत्र आर्थिक विवरणांच्या आमच्या लेखापरीक्षणाच्या संयोगाने आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे.

अंतर्गत आर्थिक नियंत्रणासाठी व्यवस्थापनाची जबाबदारी

इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने जारी केलेल्या आर्थिक अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक नोटमध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकांचा विचार करून कंपनीने स्थापन केलेल्या आर्थिक अहवालाच्या निकषांवर अंतर्गत नियंत्रणाच्या आधारे कंपनी कायदा २०१३ अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रस्थापित आणि राखण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन जबाबदार आहे. या जबाबदाऱ्यांमध्ये कंपनीच्या धोरणांचे पालन करणे, तिच्या मालमत्तेचे संरक्षण, फसवणूक आणि त्रुटी रोखणे आणि शोधणे, अचूकता आणि पूर्णता, वित्तीय माहितीची रेकॉर्डिंग आणि पूर्णता, आवश्यक वेळ म्हणून रेकॉर्ड करणे आणि रेकॉर्ड करणे यासह व्यवसायाचे सुव्यवस्थित आणि कार्यक्षम आचरण सुनिश्चित करण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत असलेल्या पुरेशा अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल यांचा समावेश आहे.

लेखापरीक्षकांची जबाबदारी

आमच्या लेखापरीक्षणाच्या आधारे वित्तीय अहवालावर कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणांवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण ICAI द्वारे जारी केलेल्या आणि कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १४३(१०) अंतर्गत विहित मानल्या गेलेल्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक नोट ("मार्गदर्शक नोट") नुसार केले. इंटरनल फायनान्शियल कंट्रोल्सच्या लेखापरीक्षणासाठी लागू आणि, भारतीय चार्टर्ड अकाउंटंट्स संस्थेने जारी केलेले दोन्ही. त्या मानके आणि मार्गदर्शक सूचनांनुसार आम्ही नैतिक आवश्यकतांचे पालन करणे आवश्यक आहे आणि आर्थिक अहवालावर पुरेशी अंतर्गत आर्थिक नियंत्रणे स्थापित आणि राखली गेली आहेत की नाही आणि अशी नियंत्रणे सर्व भौतिक बाबींमध्ये प्रभावीपणे चालवली गेली आहेत की नाही याबद्दल वाजवी हमी मिळविण्यासाठी आम्ही योजना आखणे आणि ऑडिट करणे आवश्यक आहे.

आमच्या लेखापरीक्षणामध्ये आर्थिक अहवालावर अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीची सुयोग्यता आणि त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल लेखापरीक्षण पुरावे मिळविण्यासाठी प्रक्रिया पार पाडणे समाविष्ट आहे. आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या आमच्या लेखापरीक्षणामध्ये आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांची समज प्राप्त करणे, भौतिक कमकुवतपणा अस्तित्वात असलेल्या जोखमीचे मूल्यांकन करणे आणि मूल्यांकन केलेल्या जोखमीवर आधारित अंतर्गत नियंत्रणाची रचना आणि कार्यक्षमतेची चाचणी आणि मूल्यांकन करणे समाविष्ट आहे. निवडलेल्या कार्यपद्धती लेखापरीक्षकांच्या निर्णयावर अवलंबून असतात, ज्यात फसवणूक किंवा त्रुटीमुळे असले तरी आर्थिक स्टेटमेंट्सच्या भौतिक चुकीच्या विधानाच्या जोखमींचे मूल्यांकन करणे.

आम्हाला मिळालेले लेखापरीक्षण पुरावे आर्थिक अहवालाबाबत कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणालीवर आमच्या ऑडिट मताचा आधार देण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहेत असे आम्ही मानतो.

आर्थिक नोंदींवर अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचा अर्थ

वित्तीय अहवालावरील कंपनीचे अंतर्गत आर्थिक नियंत्रण ही आर्थिक अहवालाच्या विश्वासार्हतेबाबत वाजवी हमी देण्यासाठी आणि सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या लेखा तत्त्वांनुसार बाह्य हेतूंसाठी आर्थिक स्टेटमेन्ट तयार करण्यासाठी डिझाइन केलेली प्रक्रिया आहे. वित्तीय अहवालावरील कंपनीच्या अंतर्गत आर्थिक नियंत्रणामध्ये त्या धोरणे आणि कार्यपद्धतींचा समावेश होतो जे (१) रेकॉर्डच्या देखरेखीशी संबंधित असतात जे वाजवी तपशिलात कंपनीच्या मालमत्तेचे व्यवहार आणि स्वभाव अचूकपणे आणि निष्पक्षपणे प्रतिबिंबित करतात (२) सामान्यतः स्वीकारल्या गेलेल्या लेखा तत्त्वांनुसार आर्थिक स्टेटमेन्ट तयार करण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यकतेनुसार व्यवहार नोंदवले जातात आणि कंपनीच्या पावत्या आणि खर्च कंपनीच्या व्यवस्थापन आणि संचालकांच्या अधिकृततेनुसारच केले जात आहेत आणि (३) कंपनीच्या मालमत्तेचे अनधिकृत अधिग्रहण, वापर किंवा विल्हेवाट रोखणे किंवा वेळेवर शोधणे यासंबंधी वाजवी आश्वासन प्रदान करणे ज्याचा आर्थिक स्टेटमेन्टवर भौतिक परिणाम होऊ शकतो.

आर्थिक नोंदींवर अंतर्गत आर्थिक नियंत्रणाच्या प्रमुख मर्यादा

आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या अंतर्निहित मर्यादांमुळे, नियंत्रणांचे संगनमत किंवा अयोग्य व्यवस्थापन ओव्हरराइड होण्याच्या शक्यतेसह, त्रुटी किंवा फसवणुकीमुळे भौतिक चुकीची विधाने होऊ शकतात आणि शोधली जाऊ शकत नाहीत. तसेच, भविष्यातील कालावधीसाठी आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांच्या कोणत्याही मूल्यमापनाचे अंदाज या जोखमीच्या अधीन आहेत की आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रण परिस्थितीतील बदलांमुळे अपुरे पडू शकते किंवा धोरणे किंवा कार्यपद्धतींचे पालन करण्याचे प्रमाण बिघडू शकते.

मत

आमच्या मते, कंपनीकडे सर्व भौतिक बाबतीत, आर्थिक अहवालावर पुरेशी अंतर्गत आर्थिक नियंत्रण प्रणाली आहे आणि आर्थिक अहवालावरील अशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ३१ मार्च २०१७ पासून प्रभावीपणे कार्यरत होती, जी कंपनीने स्थापन केलेल्या वित्तीय अहवाल निकषांवर अंतर्गत नियंत्रणाच्या आधारे अंतर्गत नियंत्रणाच्या आवश्यक घटकांचा विचार करून फायनान्शियल ओव्हरऑडिट ऑफ इंटरनॅशनल रीपोर्टिंग इन फिनिशियल ओव्हर ऑडिट द्वारे जारी केलेल्या मार्गदर्शक नोटमध्ये नमूद केले आहे. भारताचे चार्टर्ड अकाउंटंट. आम्ही ३१ मार्च २०१७ पर्यंत कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लिमिटेड ("कंपनी") च्या त्या तारखेला संपलेल्या वर्षासाठी कंपनीच्या स्वतंत्र आर्थिक विवरणांच्या आमच्या लेखापरीक्षणाच्या संयोगाने आर्थिक अहवालावरील अंतर्गत आर्थिक नियंत्रणांचे लेखापरीक्षण केले आहे.

महेश गुरव अँड कंपनीसाठी
चार्टर्ड अकाऊंटंट्स
एफ आर एन : ११६५९८ डब्ल्यू

सीए महेश एम. गुरव
भागीदार
एम. क्र. १०५५५१
यूडीआयएन: **२४१०१५५५ बीकेसीपीएलक्यू ८६८३**

दिनांक : २०/०७/२४
स्थान : कोल्हापूर

1. लेखापरीक्षण अहवालावरील टिप्पण्या व निरीक्षणे

समभाग अर्ज रक्कम (**Share Application Money**)

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ४३(६) नुसार, समभाग अर्जाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत समभागांचे वाटप (**Allotment**) करणे आवश्यक आहे. जर कंपनीने निर्धारित ६० दिवसांच्या कालावधीत समभागांचे वाटप केले नाही, तर त्यानंतरच्या १५ दिवसांच्या आत अर्जदारांना प्राप्त झालेली रक्कम परत करणे बंधनकारक आहे. अन्यथा, कंपनीस ६० दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर वार्षिक १२% दराने व्याजासह ती रक्कम परत करावी लागते.

तसेच, निर्धारित कालावधीत परतफेड न झाल्यास, ७६ व्या दिवसापासून कंपनीकडे असलेली संपूर्ण समभाग अर्ज रक्कम ही ठेव (**Deposit**) म्हणून गणली जाईल व ठेवीशी संबंधित सर्व वैधानिक तरतुदी त्या रकमेस लागू होतील. लेखापरीक्षणादरम्यान असे आढळून आले की कंपनीने रु. १४,५०,६४,०००/- इतक्या समभाग अर्ज रकमेबाबत निर्धारित कालावधीत समभागांचे वाटप केलेले नाही. त्यामुळे वरील तरतुदींनुसार सदर रक्कम ठेव (**Deposit**) म्हणून विचारात घेतली जाऊ शकते व ठेवांशी संबंधित सर्व तरतुदी लागू होऊ शकतात. तसेच, कंपनीचे अधिकृत भागभांडवल (**Authorised Share Capital**) रु. २,५०,००,०००/- इतके आहे.

2. वैधानिक देणी (**Statutory Dues**) दिनांक ३१-०३-२०१७ रोजी कंपनीकडून खालील वैधानिक देणी अदा करण्यात आलेली नाहीत : मूल्यवर्धित कर (**VAT**) - रु. **1-** १०,५७,२३७/- कामगार उपकर (**Labour Cess**) - रु. ६,५६,३६२/-

3. गोरेगाव फिल्म सिटीकडे देय रक्कम गोरेगाव फिल्म सिटीने कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ लिमिटेडच्या वतीने विविध खर्च अदा केले आहेत. त्याबाबत दिनांक ३१-०३-२०१७ रोजी रु. ५१,११,६८०/- इतकी रक्कम देय (**Payable**) आहे.

4. स्थावर मालमत्तेवरील घसारा (**Depreciation on Fixed Assets**) कंपनीने कंपनी अधिनियम, २०१३ नुसार **WDV (Written Down Value)** पद्धतीने घसारा आकारला आहे. तथापि, खालील मालमत्तांवर घसारा आकारण्यात आलेला नाही :

अ) भाडेपट्ट्यावरील जमीन (**Leasehold Land**)

लेखा मानक **AS-**10 (**Property, Plant and Equipment**) नुसार जमिनीचे उपयुक्त आयुष्य निश्चित करता येत नसल्यामुळे जमीन ही घसारा आकारण्यायोग्य मालमत्ता मानली जात नाही.

ब) जनरेटर व्हॅन (**Generator Van**)

सदर वाहन सध्या वापरात नसून विल्हेवाटीसाठी (**Held for Disposal**) ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यावर घसारा आकारण्यात आलेला नाही.

क) शूटिंग व्हॅन (**Shooting Van**)

सदर वाहन सध्या वापरात नसून विल्हेवाटीसाठी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यावर घसारा आकारण्यात आलेला नाही.

ड) ट्रॅक्टर व टँकर (Tractor & Tanker)

ही मालमत्ता विल्हेवाटीसाठी राखून ठेवण्यात आली असल्याने त्यावर घसारा आकारण्यात आलेला नाही.

५. न भरलेली इतर देणी (Other Liabilities Not Paid)

लेखापरीक्षण कालावधीदरम्यान खालील देण्यांबाबत कंपनीकडून समाधानकारक स्पष्टीकरण, तपशीलवार यादी, पुष्टीकरणे (Confirmations) अथवा आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

a) मुख्यमंत्री सहाय्यता निधी - ४०१७/-
b) कर्मचारी आगाऊ रकमांमध्ये जमा शिल्लक - ८४०/-
c) सनड्राय डेब्टर्समध्ये जमा शिल्लक- १३,२१,९८८/-
d) भूकंप निधी- २३५६ /-
e) सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी - १०,०००/-
f) महाराष्ट्र शासन - ३०/-
g) प्राप्तीकर- ३८३४/-
h) सुट्टीचे वेतन आणि निवृत्तीवेतन- ७१९२/-
i) इतर वसुली - १२५६/-
j) इतर - ४२२६/-
k) खर्चांसाठी देय थकबाकी - २,७०,७८४/-
l) देय भविष्यनिर्वाह निधी - ४४,८४१/-

m) बयाणा ठेव रक्कम (Earnest Money Deposit)

कंपनीच्या लेख्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या बयाणा ठेव रकमेबाबत (Earnest Money Deposit) लेखापरीक्षणादरम्यान कंपनीकडून समाधानकारक स्पष्टीकरण, संबंधित तपशील, आधार कागदपत्रे अथवा पुष्टीकरणे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सदर शिल्लक रकमेची सत्यता व अचूकता पडताळून पाहणे आम्हाला शक्य झाले नाही. परिणामी, या बाबीचा वित्तीय विवरणपत्रांवर होणारा संभाव्य परिणाम निश्चित करणे आम्हाला शक्य झालेले नाही.

५. इतर मालमत्ता -लेखापरीक्षणाच्या काळात कंपनीने आम्हाला खालील मालमत्तांबाबत समाधानकारक स्पष्टीकरण यादी, निश्चिती इत्यादी दिलेली नाही.

a) पाणीपुरवठा योजना (एमआयडीसी) आगाऊ प्रदानः १४,९४,४००/-
b) ठेव- जलसिंचन विभाग- ८७३०/-
c) ठेव- दूरध्वनी विभाग- ६०००/-

d) मिटकॉन- सल्लागार आगाऊ रक्कम - १,५४,४९५/-

e) पी. जी. सूर्यवंशी- ६८६/-

f) पोर्ट कन्सल्टंट प्रा. लि.- ३९३८९/-

g) सुरक्षा अनामत (एमएसईडी) - ३०००/-

h) कर्मचारी आगाऊ रक्कम - ३१,६७२/-

i) जल ठेवी - १०,०००/-

७. आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार खालील टप्प्यांमध्ये टेंडर प्रक्रिया पार पाडण्यात आल्या-

a) एमआयडीसीने केसीएनच्या कामासाठी अंदाजित खर्चाला तांत्रिक मंजुरी दिली.

b) एमआयडीसीकडून तांत्रिक मंजुरी आल्यानंतर केसीएनच्या संचालक मंडळाने ई-टेंडर प्रक्रियेला मंजुरी दिली.

c) त्यानंतर केसीएनच्या संचालक मंडळाने टेंडरसाठी जाहिरात दिली.

d) आमंत्रित केलेल्या टेंडरला एकाच कंपनीने प्रतिसाद दिल्यास दुसरे आवाहन केले जाते. अशा प्रकारे तीन वेळा आवाहन केले जाते.

e) तिसऱ्या आवाहनातही एकाच कंपनीने प्रतिसाद दिल्यास त्याच प्रतिसादकर्त्याचा विचार त्या कामासाठी केला जातो.

f) टेंडरच्या अटी आणि शर्ती तपासल्यानंतर एमआयडीसी केसीएलना पात्र लिलावकर्त्यांबद्दल माहिती देते.

g) लिलावकर्त्याने आणि वास्तुरचनाकारांकडून काम पूर्ण झाल्यानंतर वास्तुरचनाकाराला चालू खात्याचे देयक दिले जाते आणि एमआयडीसी देयक तपासून देयकाला मंजुरी देते.

८. वार्षिक सर्वसाधारण सभा आणि संचालक मंडळाच्या सभा:

a) वार्षिक सर्वसाधारण सभा

फक्त एका व्यक्तीची कंपनी वगळता इतर सर्व कंपन्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा दर वर्षी घेणे अपेक्षित आहे.

पहिली सर्वसाधारण सभा कंपनीची स्थापना झाल्यानंतर पहिले आर्थिक वर्ष संपल्यापासून नऊ (९) महिन्यांच्या कालावधीत घेणे आवश्यक आहे.

पहिल्या एजीएमनंतर इतर सर्व वार्षिक सर्वसाधारण सभा आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत घेतली पाहिजे. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार २०१५-१६ मध्ये एजीएम घेण्यात आली नव्हती.

b) संचालक मंडळाच्या सभा:

दर वर्षी किमान ४ संचालक मंडळाच्या सभा घेतल्या पाहिजेत आणि सलग दोन सभांमध्ये १२० दिवसांपेक्षा जास्त अंतर असू नये. कंपनीने १ संचालक मंडळाची सभा घेतली आहे. कंपनीने संचालक मंडळाच्या सभेच्या आवश्यकतांची पूर्तता केली नाही.

9) कंपनीने सक्तीच्या आरओसी पूर्तता आणि दाखल करण्याची पूर्तता केलेली नाही.

10)कंपनीने प्राप्तीकर परतावा दाखल केलेला नाही. या वर्षासाठीचा टीडीएस ९९,३२०/- रूपये आहे.

11) कंपनीला कंपनीचे रोजचे खर्च पूर्ण करण्यासाठी व्यवस्थापकीय अनुदान प्राप्त झालेले आहे. मंजुरी खर्चात स्पष्टपणे नमूद केले आहे की त्याचा वापर सर्वप्रथम रोजच्या गरजांच्या पूर्ततांसाठी करण्यात यावा आणि त्यानंतर त्याचा वापर भांडवली खर्चासाठी करता येईल. परंतु, व्यवस्थापन धोरणानुसार त्याला पावती स्वरूपात मंजुरी दिली जाते आणि वर्षभरातील प्रत्यक्ष खर्चाच्या स्वरूपात प्रदान केले जाते. त्याचा वापर भांडवली खर्चासाठी करू नये आणि उर्वरित अनुदान पुढील वर्षी पुढे नेण्यात यावे. त्याचे तपशील लेखापरीक्षणाच्या नोंदींमध्ये देण्यात आले आहेत. व्यवस्थापन अनुदानासाठी प्राप्त झालेली रक्कम स्वतंत्र बँक खात्यात ठेवण्यात यावी. परंतु, कंपनी हे खाते राखत नाही.

महेश गुरव अँड कंपनीसाठी
चार्टर्ड अकाऊंटंट्स
एफ आर एन : ११६५९८ डब्ल्यू

सीए महेश एम. गुरव
भागीदार
एम. क्र. १०५५१
यूडीआयएन: २४१०१५५ बीकेसीपीएलक्यू

८६८३

दिनांक : २०/०७/२४
स्थान : कोल्हापूर

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित

३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद

तपशील	नोंद क्र.	चालू आर्थिक वर्ष 2016-17 च्या शेवटी	मागील नोंदणी कालावधीसाठी आकडेवारी 2015-16
I. समभाग आणि उत्तरदायित्वे :			
(1) समभागधारकांचे निधी			
a. समभाग भांडवल	3	2,43,00,900	2,43,00,900
b. राखीव आणि अतिरिक्त	4	(91,01,946)	(1,43,39,659
c. शेअर वॉरंटद्वारे प्राप्त झाले ली रक्कम	-	-	-
(2) समभाग अर्ज रक्कम प्रलंबित वितरण		14,50,64,000	9,70,64,000
(3) कार्यरत नसलेली उत्तरदायित्वे :			
a. दीर्घकालीन कर्जे	5	33,200	33,200
b. डेफर्ड कर उत्तरदायित्वे (निव्वळ)	-	-	-
c. इतर दीर्घकालीन उत्तरदायित्वे	-	-	-
d. दीर्घकालीन तरतुदी	-	-	-
(4) चालू उत्तरदायित्वे :			
a. लघुकालीन कर्जे	-	-	-
b. देय व्यापार	-	-	-
c. इतर विद्यमान उत्तरदायित्वे	6	75,90,366	30,34,594
d. लघुकालीन तरतुदी	7	40,000	9,090
एकूण		16,79,26,520	11,01,02,125
II. मालमत्ता :			
(1) बिगर चालू मालमत्ता :			
a. स्थिर मालमत्ता :			
i स्थावर मालमत्ता	8	18,76,457	20,89,586
ii जंगम मालमत्ता	-	-	-
iii भांडवली काम सुरू	-	10,72,61,057	4,88,08,167
b. बिगर चालू गुंतवणूक	-	-	-
c. डेफर्ड कर- मालमत्ता (निव्वळ)	-	-	-
d. दीर्घकालीन कर्ज आणि आगाऊ रकमा	-	-	-
e. इतर बिगर चालू मालमत्ता	-	-	-
(2) चालू मालमत्ता :			
i चालू गुंतवणुका	9	23,13,092	4,71,58,170
ii इन्वेंटरीज	10	4,16,955	4,16,955
iii व्यापारातून प्राप्त होणाऱ्या रकमा	11	4,87,272	4,87,272
iv रोख आणि रोख समकक्ष	12	5,26,45,409	83,15,017
v लघुकालीन कर्जे आणि आगाऊ रकमा	13	-	-
vi इतर चालू मालमत्ता	14	29,26,278	28,26,958
एकूण		16,79,26,520	11,01,02,125
आर्थिक विवरणपत्राचा भाग असले ल्या सोबत जोडलेल्या नोंदी पाहा	1,2 & 20		

आमच्या सम तारखेच्या जोडलेल्या अहवालानुसार
महेश गुरव आणि कंपनीसाठी
चार्टर्ड अकाऊंटंट्स
एफआरएन: ११६५९८डब्ल्यू

सीए महेश एम. गुरव
भागीदार
एम. क्र. १०१५५१
स्थान- कोल्हापूर
यूडीआयएन: २४१०१५५१बीकेसीपीएलएन २१९३
दिनांक: २०/०७/२०२४

संचालक मंडळासाठी आणि वतीने

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित

३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी नफा आणि तोट्याचे पत्रक

अनु क्र.	तपशील	नोंद क्र.	चालू आर्थिक वर्ष 2015-16 च्या शेवटी	मागील नोंदणी कालावधीसाठी आकडेवारी 2014-15
I.	कार्यान्वयनातून महसूल	15	3,82,511	37,050
II.	इतर उत्पन्न	16	63,63,849	31,43,690
III.	**एकूण महसूल (I + II)**		**67,46,360**	**31,80,740**
IV.	खर्च :			
	वापरलेल्या मालाची किंमत	-	-	
	कर्मचारी लाभ खर्च	17	80,000	26,351
	वित्तीय खर्च	-	-	
	घसारा आणि कर्जमाफी खर्च	18	2,51,829	2,44,691
	इतर खर्च	19	24,41,740	12,60,022
	एकूण खर्च		**27,73,569**	**15,31,064**
V.	**अपवादात्मक आणि अतिरिक्त बाबींपूर्वी नफा आणि कर (III - IV)**		**39,72,791**	**16,49,676**
VI.	अपवादात्मक बाबी		-	
VII.	असामान्य बाबी आणि करपूर्व नफा		39,72,791	16,49,676
VIII.	असामान्य बाबी		-	
IX.	(VII - VIII)		**39,72,791**	**16,49,676**
X.	कर खर्च			
	1 चालू कर		-	-
	2 विचरित कर		-	-
XI.	सातत्यपूर्ण कार्यान्वयनातून कालावधीचा नफा		39,72,791	16,49,676
XII.	बंद झालेल्या कार्यान्वयनातून कालावधीचा नफा / (तोटा)		-	
XIII.	सातत्यपूर्ण कार्यान्वयनाचा करांसाठी खर्च		-	
XIV.	बंद झालेल्या कार्यान्वयनातून करोत्तर नफा / (तोटा)		-	
XV.	कालावधीसाठी नफा		**39,72,791**	**16,49,676**
XVI.	प्रति समभाग उत्पन्न			
	1 पायाभूत		16.35	6.79
	2 विभाजित		16.35	6.79
	आर्थिक विवरणपत्राचा भाग असले ल्या सोबत जोडलेल्या नोंदी पाहा	**1,2 & 20**		

येथे संदर्भित केलेल्या नोंदी आर्थिक विवरणपत्राचा अविभाज्य भाग आहेत .

आमच्या सम तारखेच्या जोडलेल्या अहवालानुसार
महेश गुरव आणि कंपनीसाठी
चार्टर्ड अकाऊंटंट्स
एफआरएन: ११६५९८डब्ल्यू

सीए महेश एम . गुरव
भागीदार
एम. क्र. १०१५५१
स्थान- कोल्हापूर
यूडीआयएनः २४१०१५५१बीकेसीपीएलएन २१९३
दिनांक: २०/०७/२०२४

संचालक मंडळासाठी आणि वतीने

कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर

कोल्हापूर चित्रनगरी महामं डळ मर्या दित

३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षा साठी रोख प्रवाह ताळेबं द

तपशील	31 मार्च 2017 रोजी संपलेले वर्ष		31 मार्च 2016 रोजी संपलेले वर्ष	
	रू.	रू.	रू.	रू.
कार्यान्वित उपक्रमां मधून रोख प्रवाह				
